फळशास्त्र विभाग
उद्यानविद्या विद्याशाखा
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

क्र.वि.प्र./ सं.सु.प्र/ प्रक्षेत्र/———/१२४२/२०२५ दि. २० / ०६/२०२५

**दर पत्रक सूचना**

प्रती,
प्रभारी अधिकारी
संगणक विभाग (ARIS cell)
डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला

विषय : फळशास्त्र विभागा अंतर्गत प्रक्षेत्रामधील कामे बाहयस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबत...

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, या विभागास प्रक्षेत्रा वरील विविध कामे करार पद्धतीने बाहयस्त्रोतातून करावयाची आहेत. तरी कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील विविध प्रकारची कामे करण्या करिता दरपत्रके या कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्याचे करावेत.

| अ. क्र | कामाचे विवरण | सादर करावयाचा दर |
|---|---|---|
| ०१ | किडनाशक, सुष्मअन्नद्रव्य व तणनाशक ई.ची फवारणी करणे पाठीवरच्या पंपाने | प्रती पंप |
| ०२ | फळबाग प्रक्षेत्रावरील निदन करणे | प्रति हेक्टर |
| ०३ | प्रक्षेत्रावरील धसकटे, कचरा व काश्या वेचणे | प्रती हेक्टर |
| ०४ | फळ पिकाचे मातूवृक्षाचे आळे उखरी करणे | प्रती झाड |
| ०५ | फळ पिकाचे आळे टाचन करून खते देणे | प्रती झाड |
| ०६ | फळ पिकाना बोर्डो मिश्रण करून लावणे २ ते ५ वर्षाचे झाड | प्रती झाड |
| ०७ | फळ पिकाना पाच वर्ष वरील झाडांना बोर्डो मिश्रण लावणे | प्रती झाड |
| ०८ | तीन वर्षा पर्यंत फळ झाडांची फुट काढणे. | प्रती झाड |
| ०९ | सहा वर्षा वरील वयाची मातूवृक्षाच्या फळ झाडांची फुट काढणे. | प्रती झाड |
| १० | फळ झाडाची लागवड करीता बेडवर खड्डा (२x२)फुट करणे व कलमाची लागवड करणे तसेच खड्डा,शेणखत/ रासयानिक खात, बुरशीनाशक ई. द्वारेभरणे. | खड्डा करणे, भरणे, रासायनिक खात,शेणखत भरणे व कलम लागवड करणे या नुसार दर प्रति झाड |
| ११ | प्रक्षेत्रावर ब्रश कटरने तन यव्स्थापन करणे संपूर्ण साहित्य उदा मशीन, पेट्रोल ई. सह | प्रति एकर |

टिप:सर्व दर पत्रके दि.२७/०६/२०२५रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत. सर्व दर पत्रके हे निम्नस्वाक्षरी करिता यांच्या नावे खालील कार्यालयीन पत्त्यावर विहित मुदतीच्या आत पोहचविण्याचे करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती

1. दर पत्रके मोहरबंद लिफाफ्या मध्ये सादर करावीत.
2. लीफापाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात **प्रक्षेत्रा मधील विविध कामे बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबत'** असे नमूदकरावे
3. दर पत्रका मध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्रक क्र. वि.प्र./फळरोपवाटिका/~~———~~/प्रक्षेत्र/२४२/२०२५ व दि. २०/०६/२०२५ नमूद करावे.
4. देयक सादर करतांना, जी.एस.टी. संबधी त्रुटी निर्माण झाल्यास शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटीची पूर्तता करण्याची जबाबदारी हि पुरवठादाराची असते.
5. अडीच लाख वरील अंतीम देयका मधून एकूण रकमेच्या २ टक्के जि.एस.टी आणि १ टक्के टी डी एस कपात करण्यात येईल व त्याचा परतावा आय टी रिटर्न भरताना केल्या जाईल.
6. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.
7. कोणतीही दरपत्रक पूर्णता अथवा अंशतः स्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.
8. समाधान कारक काम पूर्ण झाल्या नंतरच पूर्ण देयक अदा केल्या जाईल.
9. सदरचे काम हे ठराविक कालावधीत पूर्ण करणे बंदनकारकअसेल.
10. या दर प्रक्रीय अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.
11. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance) ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
12. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.
13. संबंधित ठेकेदाराने कामाचे दर हे किती दिवसा करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमूद करावे अन्यथा सदरचे दर हे ~~९८० दिवस करिता अथवा~~ ३१ मार्च २०२६ पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.
14. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयक अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील.
15. दर पत्रक मंजूर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.
16. कामा करिता लागणारे औजारे उदा. फवारणी पंप, ब्रश, विळा, आरी, कैची, सीकेटर ई. हे संबंधित ठेकेदाराणे पुरवणे आवश्यक आहे.
17. दर प्रक्रीये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.
18. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबत दर पत्रकावर स्वतंत्रपणे अथवा वेगळे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्या सह दर पत्रक सोबत सादर करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Officer In Charge, Agricultural Research Station, Dr. P.D.K.V. Akola
Inward No. 172
Dt. 20/6/2025